जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम व संत कबीर यांच्याविषयीच्या 'विचारशलाका' विशेषांकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश पवार.

# संत तुकाराम, कबीर यांच्या विचारांची समाजाला गरज

## कुलगुरू : विद्यापीठात 'विचारशलाका'चे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : 'संत तुकाराम व संत कबीर यांनी समाजातील रुढी, विषमता, कर्मकांडावर प्रखर प्रहार करून समता, बंधुता व मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार केला, त्या विचारांची आज समाजाला आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र व मराठी अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या 'विचारशलाका' त्रैमासिकाच्या 'संत तुकाराम व संत कबीर विचारविश्व' विशेषांकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते.

डॉ. कामत म्हणाले, 'संत तुकाराम व कबीर यांच्या साहित्याचे, सामाजिक चळवळीतील महत्त्व मोठे आहे. वैचारिक साहित्याची निर्मिती व प्रसार करण्यासाठी विचारशलाका त्रैमासिक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. बदलत्या समाजव्यवस्थेतही या दोन्ही संतांच्या साहित्याचा व सामाजिक विचारांचा संदर्भ मोलाचा आहे.'

डॉ. चौसाळकर यांनी तुकाराम व कबीर यांच्या साहित्याचा समाज जीवनावरील प्रभाव स्पष्ट केला. दोन्ही संतांच्या वैचारिक व सैद्धांतिक मांडणीतील सामाजिक समतेचा आग्रह त्यांनी अधोरेखित केला.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी लोकभाषेच्या माध्यमातून व्यापक समाजाशी साधलेला संवाद हा तुकाराम व कबीर यांच्या साहित्याच्या प्रभावाचा महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी विचारशलाकाच्या प्रवासाची माहिती दिली. यावेळी डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 SEP 2026

पुण्यनगरी

# विविध क्षेत्रांत महिलांना समान संधी आवश्यक

## प्रा. डॉ. प्रतिमा पवार : महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्षाचे उद्‌घाटन

**उचगाव :** शिक्षण, रोजगार व आरोग्य यांच्या सुविधाद्वारे राजकीय, आर्थिक व समाजिक क्षेत्रांत महिलांना समान संधी आवश्यक आहे. महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण हे स्त्रीला सक्षमीकरण करण्याचे सर्वात प्रभावी साधन असून, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रकारच्या महिला विकास कक्षाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी केले.




महिला विकास कक्ष उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. प्रतिमा पवार. सोबत डॉ. कल्पना गंगातीरकर, प्रा. माधवी मोरे, डॉ. संध्या जाधव, डॉ. श्रद्धा पाटील.

महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्ष उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपास पाणी घालून या महिला विकास कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी श्रावणमास ऋतू हिरवा या अनुषंगाने महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध उपक्रम राबवण्यात आले. विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल्स उपलब्ध करून दिले. इ. १२ वी वाणिज्य-ब वर्गातील राजनंदिनी किरण पडवळ हिची श्रावण क्वीन म्हणून निवड करण्यात आली.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. संध्या जाधव यांनी करून दिला. आभार डॉ. अश्विनी कोटणीस यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. माधुरी रसाळ यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2026
लोकमत

# विद्यापीठाचे दोन विद्यार्थी मॉस्को परिषदेत

लोकमत न्यूज नेटवर्क



वैभव कदम



प्राजक्ता डवरी

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषा शिकणारे विद्यार्थी वैभव कदम आणि प्राजक्ता डवरी यांनी मॉस्को, रशिया येथे १६ ते १८ सप्टेंबर २०२६ दरम्यान आयोजित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय रसोफिल चळवळी'च्या चौथ्या परिषदेत सहभाग घेतला. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी दोन्ही विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर ११ ते २० सप्टेंबर या कालावधीत मॉस्को शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्राजक्ता डवरी या रशियन भाषा एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी असून, वैभव कदम हे रशियन भाषा पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आहेत.

यापूर्वीही गेल्या दोन वर्षांत विभागातील रशियन भाषा शिकणाऱ्या आठ विद्यार्थ्यांनी मॉस्को येथील 'रशियन पीपल्स फ्रेंडशिप विद्यापीठा'तर्फे आयोजित १५ दिवसांच्या मोफत समर कोर्समध्ये सहभाग घेऊन तो यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या विद्यार्थ्यांना रशियन भाषा शिक्षिका डॉ. मेघा पानसरे, ज्योती पाटील, डॉ. अक्षय सरवदे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2026
लोकमत

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा, संशोधन पोस्टर स्पर्धा आणि टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी उपक्रमस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. पल्लवी भोसले व डॉ. स्मिता पोरे यांनी नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात 'प्रबोधन'कार ठाकरे जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, उपकुलसचिव दीपक अडगळे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, विनोद लोखंडे, सुनील वाजे, कुलदीप औटे, अवधूत गंगधर यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2026
पुढारी

# मोडीलिपी अभ्यासक्रम प्रवेशाची २८ पर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभागाच्या वतीने मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना २८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. शिवपूर्वकाळापासून स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासन व दैनंदिन व्यवहारात मराठीसोबत मोडी लिपीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. त्यामुळे ऐतिहासिक कागदपत्रे समजून घेणे, संशोधन करणे तसेच प्रशासकीय दस्तऐवजांचे वाचन करण्यासाठी मोडीलिपीचे ज्ञान महत्त्वाचे आहे. शेतीविषयक नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदीखते आणि जुन्या न्यायालयीन कागदपत्रांमध्ये मोडीलिपीचा वापर आढळतो. या दस्तऐवजांचे लिप्यांतर करून रोजगाराच्या संधीही निर्माण होऊ शकतात. संशोधक विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.